## ।। प्रकरण दुसरे ।।

## प्रकरण दुसरे

## अरे संसार संसार या कादंबरीचा आशय

मुंबई नगरीतील मध्यमवर्गीय कौटुंबिक परिस्थतीवर अवलंबून असणारी " अरे संसार संसार " ही कादंबरी प्रभाकर पेंढारकर यांनी लिहीली आहे. लेखकानेच निवेदकाची भूमिका पार पाडलेली आहे. निवेदक बँकेमध्ये टाइपरायटरचे काम करीत असतो. निवेदकाची बँकेमध्येच काम करणारी मंदा नावाची मैत्रिण असते. ती निवेदकाच्या जीवनामध्ये येणा-या अडीअडचणीबाबतची विचारपूस करून योग्य तो सल्ला देते.

निवेदकाची आई कोल्हापूरमध्ये रहावयास असते. ती वारंवार आजारी पडते. आजारपणासाठी तिला पैसे पाठवावे लागतात. निवेदकाचा पगार कमी असतो. त्यामुळे त्याला आपल्या स्वतःचाच खर्च भागवून अत्यंत कमी पैसे शिल्लक रहातात. त्यांचे मामा त्याच्या लग्नाचा विचार करतात. त्यावेळी निवेदकाच्या मनामध्ये आपल्याला नोकरी असणारी पत्नी हवी अशी अपेक्षा असते. नोकरी असलेली बायको मिळाल्याने मुंबईमध्ये रहाण्यास लागणा-या जागेचा प्रश्न सुटेल. म्हणून त्यांनी बँकेचे कर्ज काढावे लागेल. त्या कर्जाचे हप्ते निवेदकाच्या पगारातून जातील व बायकोच्या पगारामुळे घरखर्च चालेल. असा विचार येतो तसेच हे घडल्यानंतर आईस मुंबईला आणता येईल. तिचा दवाखान्याचा खर्च भागवता येईल.

निवेदकाची काका-काकी, मामा-मामी यांनी श्री साठे यांची बहीण 'सुधा' हिच्याबाबत लग्न करण्याविषयी चर्चा करतात. त्यामुळे रूढी, परंपरा संस्कृती याचाही विचार करतात. मामा-मामी, व काका-काकी यांनी लग्नाविषयी नियोजन केले. परंतु या लग्नाचा होणारा खर्च कोणी करायचा? परंतु साठे यांना हे परवडणारे नव्हते. निवेदकाने अगोदरच खोलीसाठी बँकेचे कर्ज काढले होते. त्यामुळे हा खर्च निवेदकालासुध्दा परवडणारा नव्हता. त्यामुळे निवेदक स्वतः निवेदकच रजिस्टर लग्न करावयास तयार होतो.

निवेदकाची नियोजित वधू 'सुधा' हिला नोकरी नसते. त्यामुळे तिला नोकरी लावण्यासाठी प्रयत्न केला जातो. व नोकरी मिळते नियोजनाप्रमाणे रजिस्टर लग्न केले जाते.

होता की, गौरीच्या सणाला तुम्हांलाही बोलाविले आहे म्हणून सांगितले होते.

त्यावेळी निवेदकाने आणलेली वेणी व्यर्थ जाते. त्यामुळे निवेदकाचे मत सुधाविषयी नाराज होते. तो गौरीच्या सणाला जात नाही. केव्हापासून सुधाचा फोन, चिठ्ठी येत नाही. तो तिची वाट पाहण्याची सोडून देतो. त्यामुळे निवेदकाचे सुधाविषयी मत नाराज असल्यामुळे तो बेचैन होतो. निवेदक रजा काढून महादेवच्य खोलीवर जातो. त्यामुळे त्याचा मित्र त्याची विचारपूस करतो. व सल्ला देतो की, तुझ्या बायकोला घेऊन घरी जा असे सांगतो.

निवेदक तसाच सासूरवाडीला जातो. आई आजारी आहे सांगून सुधाला घेऊन घरी येतो. त्यावेळी निवेदकाची आई त्याची वाट पहात असते. त्या दोघांना पाहून तिला बरे वाटते. दुसरे दिवशी सुधा नेहमीपेक्षा उशिरा उठते. त्यावेळी निवेदक कामावर का जात नाही म्हणून विचारतो. त्यावेळी ती सांगते प्रोजेक्ट पर्ण झाला आहे. पुन्हा प्रोजेक्ट सुरू झाल्यावर बोलावितो म्हणून सांगितले आहे. हे ऐकून निवेदक उदास होतो.

नंतर निवेदकाचा मेव्हुणा साठे यांनी सुधासाठी नोकरीसाठी प्रयत्न केला. त्यांनी पटेलांच्याजवळ तसेच महादेवच्या ओळखीने प्रयत्न करतात. परंतु त्यांना यश येत नाही.

सुधा नोकरी सुटल्यानंतर आईच्या तब्बेतीची काळजी घेते. निवेदकाच्या काकाकडून आईला गणेशोत्सवाचे आमंत्रण येते. ते आईला घेऊन जातो म्हणून निरोप असतो. त्या प्रमाणे काकी गाडी घेऊन येतात. आईला घेऊन जाताना सुधाला बरोबर पाहोचविण्यासाठी घेऊन जातात. आईला सोडून सुधा घरी येते. त्या रात्री निवेदक तिला जवळ बोलावितो. आणि त्याच्या मनातील बरेच दिवसाचे बरेच प्रश्न तो विचारतो-बोल त्या रात्री तू कोठे गेलीस ? त्याच्या मनातील आलेले शंकेचे अनेक प्रश्न तो तिला विचारतो. त्यावेळी सुधा घाबरून बाथरूमकडे जाते. तिच्या पाठोपाठ निवेदक जातो. त्यावेळी ती पोटावर हात ठेवून उलटी होते. व थरथर कापू लागते हे पाहून त्यावेळी निवेदकाच्या लक्षात सर्व कळून येते की - सुधाला दिवस गेले आहेत. हे लक्षात येते.

निवेदक व त्याची पत्नी सुधा यांची संसाराबाबत चर्चा सुरू होते. तेवढयात निवेदकाचा मेव्हुणा
१ साठे यांनी सुधा साठी एक सेकंड हॅंड टाइपरायटर, दोन खुर्च्या, एक लोखंडी कपाट इ. साहित्य दिले जाते.

निवेदकाच्या पगारापेक्षा सुधाचा पगार जास्त असतो. त्यामुळे निवेदकाच्या पगारातून कर्जाचा हप्ता भागेल आणि सुधाचा पगार घरखर्चासाठी उपयोगी पडेल असे निवेदकास वाटते.

मात्र सुधाला नोकरी मिळाल्यामुळे तिच्या वागण्यात बदल झाला होता. तिची मैत्रिण आशाच्या संपर्कामुळे लिपस्टिक लावण्याची सवय जडली. परंतु लिपस्टिक लावणे हे निवेदकाला आवडत नव्हते.

काही दिवसानंतर एका रात्री निवेदकाला जाग येते. त्यावेळी त्याची पत्नी सुधा ही त्याच्या जवळ नसते. तिला शोधण्यासाठी निवेदक दारापाशी जातो. पण दाराला बाहेरून कडी घातलेली असते. असे दिसून येते. त्यामुळे त्याच्या मनामध्ये आपल्या पत्नीविषयी अनेक शंका-कुशंका येऊ लागतात. काही वेळाने निवेदकाची पत्नी बाहेरून आत येते. परंतु तिचा चेहरा हा रडवेला असतो. त्यामुळे तिच्याविषयी त्याच्या मनामध्ये करूणा निर्माण होते.

निवेदक व सुधा लग्न होण्याच्या अगोदर ज्या हॉटेलमध्ये गेलेले असतात. त्याच हॉटेलमध्ये निवेदक सुधाला घेऊन जातो. तिला आपल्या मनातील शंकेचे निवारण करण्यासाठी अनेक प्रश्न विचारतो. परंतु ती काहीही उत्तर देत नाही. असे दिसून आल्यानंतर निवेदकाच्या मनातून सुधाविषयी हळूहळू विश्वास कमी होऊ लागतो.

निवेदकाची मैत्रिण मंदा ही सुधा विषयी चौकशी करते. त्यावेळी निवेदक नाराज होतो. त्यावेळी मंदा निवेदकास विचारते. तुम्ही सुधासाठी कोणकोणत्या गोष्टी केल्यात ? तिला प्रेम दिले का ? तिची हौस पुरी केली का ? तिला फिरायला नेले का ? प्रेमाने तिच्या मनातील विचारपूस केली का ? इत्यादि मंदा निवेदकाला प्रश्न विचारते.

मंदाने सांगितल्याप्रमाणे निवेदक सुधासाठी घरी जाताना वेणी घेऊन जातो. त्यापूर्वी निवेदकाचा मेव्हुणा साठे हे सुधाला मंगळागौरीच्या सणासाठी घेऊन जातात. त्यांनी निवेदकाच्या आईजवळ निरोप ठेवलेला

यापूर्वी सुधाला मंगळागौरीला नेलेली होती. त्यावेळी मेव्हुणा साठे यांनी सुधाला डॉक्टरांना दाखविले होते. त्यांना तिला डॉक्टरांच्या कडून इन्जेक्शन दिले होते. आणि आठ दिवस काय होते ते पाहू म्हणून सांगितले होते. त्याची ते वाट पहात होते. तोपर्यंत निवेदक सुधाला घेऊन जातो.

निवेदक मंदाकडून डॉक्टरांची चौकशी करतो. त्यावेळी मंदा डॉक्टर प्रधानांची माहिती देते. त्याप्रमाणे डॉक्टरांच्याकडे निवेदक सुधाला घेऊन जातो. त्यावेळी डॉक्टर सुधाला दिवस गेलेत, अंदाजे दोन महिने झाले आहेत म्हणून सांगतात. ते ऐकून निवेदक व मंदा आम्हाला मूल नको असे सांगतात. परंतु डॉक्टर असली ऑपरशन्स मी करीत नाही असे सांगतात. इथून तुम्ही निघून जा असे डॉक्टर सांगतात.

त्यानंतर सुधा, निवेदक विचार करीत होते. त्यावेळी सुधाची मैत्रिण आशा ती आलेली होती. ती त्यांच्याशी बोलत असताना आशा त्यांना सल्ला देते. माझेपण असेच ऑपरेशन झाले. असे सांगून ती त्या डॉक्टरांचा पत्ता देते. त्यानंतर सुधा, निवेदक, मैत्रिण आशा हे डॉक्टरांच्याकडे जातात. त्यावेळी डॉक्टर त्यांना शनिवार देतात. त्याप्रमाणे सुधाचे शनिवारी ऑपरेशन होते. त्यादिवशी संध्याकाळी सुधाला घेऊन घरी जातात. डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे औषधे घेतली जातात.

ऑपरेशन झाल्यानंतर चार दिवसांनी सुधाची तब्बेत बिघडली जाते. तिला जास्त त्रास होतो. त्यावेळी सुधा आपल्या पतीला डॉक्टर प्रधानांच्याकडे घेऊन चला म्हणून सांगते. त्याप्रमाणे निवेदक सुधाला घेऊन डॉक्टर प्रधानांच्याकडे जातात. त्यावेळी डॉक्टर त्यांना रागावतात. ज्यांनी कुणी हे ऑपरेशन केले त्यांच्याकडे जा. असे सांगतात. त्यावेळी सुधा डॉक्टरांना विनंती करते. त्यामुळे डॉक्टर चिठ्ठी देतात की, के.एम्.ई. या दवाखान्यात तिला अॅडमिट केले जाते. तिच्यावर औषधाचा उपचार केला जातो. डॉक्टर प्रधान सुधाला पाहण्यास येतात. त्यावेळी निवेदक डॉक्टरांना सुधाची तब्बेत बरी होईल का ? असा प्रश्न विचारतात. त्यावेळी डॉ. प्रधान सांगतात. ज्या कॉलीफाईड डॉक्टरांनी ऑपरेशन केले आहे. त्यांचा नोकरवर्ग हलगर्जी असेल. त्यांनी ऑपरेशनची उपकरणे व्यवस्थित उकळली नसतील. इत्यादि कारणांमुळे सुधाची तब्बेत बिघडली म्हणून ते सांगतात. त्यामुळे डॉ. प्रधान म्हणाले इथून पुढे सुधाला बरे वाटेल, पण मुल होणार नाही.

त्यावेळी सुधा निवेदकाला विचारते. डॉक्टर काय म्हणाले- निवेदक म्हणाला तुला बरे वाटेल म्हणून सांगितले आहे.

त्यानंतर सुधाची तब्बेत बिघडली जाते. तिचा ताप 107 डिग्रीगेट पर्यंत चढलेला होता. तिला बोलता येत नव्हते. त्यावेळी निवेदकाची मैत्रिण मंदा तिला पाहण्यासाठी आली होती. ती पाहून बाहेर निघून जाते. तिच्यापाठोपाठ निवेदक बाहेर जातो. त्यावेळी निवेदकास ती म्हणते-मी दिलेले 400 रूपये या कामासाठी आणलेस सुधाला मी कुंकू लावले. तिचे तोंड गोड मी केले. हे रक्ताने माखलेले पैसे मला परत देऊ नकोस. आणि पुन्हा मला भेटू नकोस. असे सांगून ती निघून गेली.

शेवटी सुधाचा अंत होतो. सुधाचे रक्षा घेऊन निवेदक नाशिकला घेऊन जातो. भडजीकडून रक्षाची पूजा करतो. उरलेसुरलेले अवशेष गोदावरीच्या पाण्यात सोडतो. व सुधाच्या आठवणीने तयाचे हृदय भरून येते.

**मध्यमवर्गीयांच्या मनोव्यथांचे चित्रण**

मुंबई येथील मध्यमवर्गीयांच्या जीवन 'अरे संसार संसार' या कांदबरीमध्ये रंगविले आहे. तेथील चित्रण मुंबई येथील राहण्याचा प्रश्न त्यासाठी दयावी लागणारी डिपॉझीट तया डिपॉझीटसाठी तडजोडीचे प्रयत्न, शिवाय घरासाठी दिलेले भाडे आणि निर्माण होणारे संसारातील प्रश्न, समस्या यावर त्यांनी घेतलेला निर्णय, त्यानुसार भोगावे लागणारे दु:ख, लागणारा खटाटोप इत्यादीचा विवेचन.

नोकरीविषयी केलेला प्रयत्न, त्यासाठी सोसावे लागणारे शारिरिक कष्ट . त्यातून मिळालेला पगार पगारातून संसारातील पतीला केलेला सहकार्य यातून जीवनाची सुरूवात. वात लग्नाआधी केलेले विचार त्याप्रमाणे वागण्यासाठी केलेला प्रयत्न इ. चे विवेचन.

बँकेतील नोकरी, मिळणारा पगार शिवाय स्वत:साठी खर्च त्यातून गावाकडे दयावे लागणारे पैसे म्हणजे आईच्या औषधासाठी लागणारे पैसे. त्यातून पडणारी वार्षिक शिल्लक 300 ते 350 रू. नंतर

UNIVERSITY

लग्न झाल्यावर महादेवकडून घेतलेली खोली त्यासाठी बँकेचे घेतलेले 8000 रूपये कर्ज, कर्जाचा हप्ता त्यासाठी बायकोला करावी लागणारी नोकरी, त्यातून बायकोला होणारा नोकरी विषयीचा ताप , शिवाय घरातील कामे आणि आईची तब्येत इ. चा केला जाणारा प्रयत्न.

**परिस्थितीमुळे निर्माण होणारी व्यथा :**

लग्नसोहळयाचे विवेचन त्यावेळची चालिरीती - परंपरा - रूढी - लग्नामध्ये मान इ. चे विवेचन परंतु परिस्थितीमुळे रजिस्ट्रर लग्नासाठी घतलेला निर्णय परिस्थितीमुळे घेतलेले घर . त्यामुळे कर्जाचा बोजा डोक्यावर , त्यामुळे बायकोला करावी लागणारी नोकरी आणि नोकरी विषयी निर्माण झालेली समस्या त्यासाठी दोघांची धावपळ त्यासाठी येणा-या संकटाना तोंड देण्याची तयारी, कर्ज फेडण्यासाठी सुधाला करावी लागणारी नोकरी. जुन्या रूढींचा तिचा नवरा , सासू शिवाय समाज, चालिरीती शुल्लक गोष्टीवर सुधावर केलेले नियंत्रण.

सुधाला दिवस जातात . त्यावेळी परिस्थितीमुळे तिचा गर्भपात करण्याचा निर्णय शिवाय पैशाचा प्रश्न त्यासाठी मागितली जाणारी भीक, मान, अपमान, दाखविलेली कारणे इ. खटाटोप करून त्यातून आलेले अपयश तिचा झालेला मृत्यू परिस्थितीमुळे सुधाच्या असणा-या इच्छा , तिच्या आठवणी , नायकावर येणारे प्रसंग याची मनोव्यथा -

आईविषयीचे आजारपण येणारा औषधचा खर्च , घराविषयी प्रश्न त्यातून मित्राकडून मिळणारी खोली, त्यासाठी, काढले जाणारे बँकेचे कर्ज, त्या कर्जाचा हप्ता त्यानंतर निर्माण झालेल्या समस्या, त्यासाठी बायकोला करावी लागणारी नोकरी, त्यामुळे घर खर्चाचा प्रश्न नोकरीची बायको. तिला लागलेली खाजगी नोकरी . बायकोविषयी आलेल्या शंका. त्यात तिला गेलेले दिवस, डॉक्टरांचा सल्ला, त्यातून पतीकडून दुस-या डॉक्टरकडे जाणे. पैशासाठी मागितलेली भीक, त्यातून पाप-पुण्य याचा विचार माणूस कशासाठी जगतो प्रसंगातून घेतलेले निर्णय. त्यामुळे आलेले दु:ख आणि आठवणी.

१ **नायिकेच मनोव्यथाचे चित्रण:**

लग्नाआधी भावी पतीबरोबर केलेली चर्चा शिवाय लग्न झाल्यावर संसाराविषयी नायिकेशी केलेली चर्चा त्यासाठी नोकरी करण्याची तयारी, स्वतःचे घर ही भुमिका त्यातून कष्ट करण्याची तयारी, नोकरीविषयी उत्साह, जीवनात आलेले नैसर्गिक संकट त्यावर केलेला उपाय, कर्ज फिटेपर्यंत घेतलेला निर्णय , त्यातून आलेले संकट , जगण्याविषयीचा प्रयत्न, इच्छा व आकांक्षा , पतिविषयीचे प्रेम.

**महानगरीतील घरात निर्माण होणारी दुःखे :**

महानगरातील लोकसंख्येमुळे घरासाठी जागेचा प्रश्न शिवाय खोलीसाठी द्यावी लागणारी पगडी, त्याशिवाय घरभाडे, बँकेचे लोन घेवून घेतलेली खोली, त्यातून खोलीत केलेली संसाराची मांडणी, कर्जामुळे संसारात केलेली खर्चाची तडजोड. त्यासाठी नोकरीची बायको करावी लागणारी. वाढत्या महागाईला तोंड देण्यासाठी आलेल्या अडचणी , नोकरी मिळण्याचा प्रश्न, शिवाय शिक्षणाचा प्रश्न , खाजगी नोकरी त्यामुळे नोकरीत करावे लागणारे कष्ट त्याशिवाय घरातील कामे करावी लागतात.

ही सगळी मध्यमवर्गीय माणसे त्यांच्या वाटयाला येणा-या परिस्थितीमुळे घडविंत गेली आहेत. त्यांच्या आयुष्याचा रंग, आयुष्यातील चढउतारी त्यामुळे ठरून जातात. उदा. स्वतः कादंबरीकारच निवेदक आणि त्याच प्रकारच्या वर्तुळात सापडलेला त्याचा मेहुणा श्री साठे. त्यांच्या आयुष्याबद्दल निवेदक म्हणतो बी. एस्.सी. ची परीक्षा पास झाला आणि निकाल जाहीर होण्यापुर्वीच साठयांचे वडील वारले. मुलाला केमिस्ट विषयात सुवर्ण पदक मिळाले . पण कौतूक करायला घरी वडीलधारी कोणच उरले नाहीत. तीन बहीणी आणि एक लहान भाऊ साठयांच्यावर एकाकी होऊन कोणालाही त्या भाराखाली किती आशा, आकांक्षचा चूराडा झाला. ' रिसर्च ' साठी परदेशी जाण्याचे स्वप्न हे त्यापैकीच एक प्रिन्सीपॉलनी साठयांना कॉलेजमध्ये बोलावून सांगितले. तुला हव्या त्या सवलती देतो. एम्.एस्.सी. होऊन एका कॉलेजने सवलती दिल्या तरी घरच्या माणसांचा पोटाचा प्रश्न त्यांना सुटत नाही. मिळणारी पहिली नोकरी साठयांनी स्विकारली. निवेदक, निवेदकाची आई, सुधा ही सारीच परिस्थितीग्रस्त झालेली माणसे आहेत. त्या जीवनाला चालना देणारी एकच साधन आहे . आणि ते म्हणजे पैसे, छोटी मोठी दुःखे, पश्चाताप वाटयाला येतात.

आणि आयुष्यातील फार मोठी मानसिक साधन त्यावरच अवलंबून असते.

**आर्थिक स्थैर्य आल्याशिवाय संसार विस्तार नको ही भूमिका :**

निवेदक एका बँकेत नोकरीला असतो. त्याचा मासिक पगार त्यातून जाणारा बँकेचा हप्ता, शिवाय खोलीभाडे, स्वतःचा खर्च, आईला औषधपाण्याचा खर्च त्यामुळे पगारातून कमीत कमी शिल्लक राहते. उदा. निवेदकाच्या लग्नाचे वय 26 ते 27 असते त्यामुळे त्याच्या मामानी स्थळ काढलेले असते. त्याला मुलगी पसंत पडते. परंतू मुलीला नोकरी नसते. त्यांच्या मनात विचार चालू असतो. आपण एक खोली घेवू त्याचा मित्र महादेव त्याची खोली घ्यावयाची ठरवितो. त्यासाठी बँकेतून कर्ज घ्यावे लागते. त्यामुळे पगारातून कर्जाचा हप्ता जाणार , त्यामुळे घर चालविण्यासाठी बायको नोकरीची पाहिजे. मामांनी काढलेली मुलगी नाकरीची असते. ती काकांच्या मित्राकडून खाजगी नोकरी मिळते. पैशाअभावी आपल्याला संसार दीड खोलीत मांडावा लागतो. सुधाला नोकरी करावी लागते. जीवनातील संसाराला सुरवात होते. कांही दिवस निघून जातात. त्यांनी ठरविल्याप्रमाणे आपल्याला कमीत कमी कर्ज फिटेपर्यंत संसाराचा विस्तार नको म्हणजे मुले नको असे ठरविलेले असते. कारण मुलगा हवा असेल तर खाजगी नोकरी असल्यामुळे त्यांना पगार मिळणार नाही. त्यामुळे घरात राहता येणार नाही. शिवाय त्या मुलाला जगण्यासाठी आपल्याला घरातील खर्च आणि घरासाठी काढलेले कर्ज फिटल्याशिवाय आपल्याला मूल नको ही भूमिका त्या दोघांनी ठामपणे घेतलेली असते. परंतू मूल नको हा घेतलेला निर्णय नैसर्गिकदृष्ट्या तो कालबाह्य ठरतो. त्याच्यावर उपाय केले जातात. त्यासाठी खर्चाची तडजोडकेली जाते. परंतू आपली भूमिका म्हणजे आर्थिक स्थैर्य आल्याशिवाय संसाराचा विस्तार नको हे पाहण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न केलेला दिसून येतो.

**त्यामुळे नायिकेचा गर्भपाताचा निर्णय :**

हा घेतलेला निर्णय त्यांच्या दृष्टीने संसार उपयोगी असतो. परंतू त्यांच्या संसारातील व्यापामुळे आणि हलगर्जीपणामुळे सुधाला दिवस जातात. ही गोष्ट आपल्या पतीला सांगण्यासाठी तिला लाज वाटते. एकेदिवशी रात्री अंदाजे 11 ते 12 च्या सुमारास ती कडी काढून बाहेर जाते आणि बाहेरून कडी घालते. त्यावेळी तिला उलटया होतात त्याच वेळी तिच्या पतीला जाग येते आणि आपल्याजवळ बायको

नाही म्हणून त्याच्याविषयी अनेक शंका येतात. तो स्वतः उठून लाईट न लावता शोध घेण्यासाठी दाराकडे जातो परंतू त्याला बाहेरून कडी असल्याचे त्याला जाणवते.

त्यामुळे त्याच्या मनामध्ये सुधाविषयी अनेक वाईट विचार येतात. आणि तो अंथरूणावर पडून राहतो. त्यावेळी ती बाहेरून आत येते आणि अंथरूणावर येऊन रडत बसते आणि हुंदके देते तो आवाज कानावर पडतो. मनात आलेले पश्न जबाब विचारावा असे वाटत होते परंतू निवेदक विचारू शकत नाही. त्याच्या मनामध्ये रडण्याचा आणि हुंदक्याचा आवाज ऐकून उत्कंठा निर्माण होते. सुधाला विचारावे तुला कोणते दुःख झाले आहे. कोणती अडचण आली आहे. इ. विचार निवेदकाच्या मनामध्ये येऊ लागतात. परंतू तो काही करू शकत नाही . काही दिवसानंतर त्याचा मेव्हणा साठे सुधाला मंगळागौरीसाठी न्यायला येतो. तिला घेऊन जातो. त्यावेळी तिचा पती बँकेत गेलेला असतो. आणि आई जवळ चिठ्ठी लिहून ठेवतो व तुम्ही मंगळागौरीला या . निवेदक आल्यानंतर चिठ्ठीविषयी विश्वास ठेवत नाही. आणितो जातही नाही.

काही दिवस निघून जातात. निवेदकाला बायकोचा फोन किंवा चिठ्ठी याची वाट पहात बसतो . परंतू त्याचे कामाकडे लक्ष नसते त्यामुळे त्याचा मित्र महादेवकडे जातो. महादेव त्याला बायकोला घेऊन ये म्हणून सांगतो. त्यामुळे तो सासुरवाडीला जातो. आईची तब्येत बरी नाही म्हणून तो त्यादिवशीच बायकोला घेऊन येतो. सुधा आलेली पाहून आईला बरे वाटते. निवेदक सुधाला घेऊन हॉटेलमध्ये जातो. त्याच्या मनामध्ये सुधाला बरेच प्रश्न विचारावयाचे असतात. परंतू सुधाकडून उत्तरे मिळत नाहीत. घरी गेल्यावर त्या रात्री सुधाला तो हेच प्रश्न विचारतो त्यावेळी सुधा बाथरूम कडे जाते त्यावेळी तिला उलटया होतात हे पाहून निवेदकाच्या लक्षात येते की सुधाला दिवस गेले आहेत. त्यामुळे तो सुधाची मैत्रिण आशा नोकरीसाठी आलेली असते परंतू या अडचणीमुळे ती नोकरीवर जाऊ शकत नाही.

मंदाने सांगितल्याप्रमाणे डॉ. प्रधानाकडे जातात परंतू डॉक्टराना मुल नको हे कारण पटू शकत नाही. म्हणून ते आशाचा सल्ला घेतात. आणि एका क्वालिफाईड डॉक्टराकडे जातात. डॉक्टरनी सांगीतल्याप्रमाणे आर्थिक तडजोड केली जाते. त्यांनी यापूर्वी घेतलेला निर्णय आर्थिक स्थैर्य आल्याशिवाय

आपल्याला मूल नको म्हणून नायिकेचा गर्भपात करणेचा निर्णय घेतात.

**तिचा मृत्यू :**

डॉ. प्रधानांशी बॅंकेत चर्चा करून त्यांनी सांगितल्याप्रमाणे निवेदक व सुधा दवाखान्यात जातात डॉक्टरानी रिपोर्ट दिला. सुधाला दिवस गेले आहेत असे डॉक्टरांनी सांगितले परंतू आम्हाला मूल नको आहे हे आमचे म्हणणे डॉक्टरांनी मान्य केले नाही. हे काम मी करणार नाही दुस-या डॉक्टरांच्याकडे जावा त्याप्रमाणे आम्हाला प्रश्न निर्माण झाला . यावेळी मी सुधा आणि आशा याविषयी चर्चा केली. त्यावेळी आशाने सांगितल्याप्रमाणे आम्ही त्या डॉक्टरांच्याकडे गेलो. त्याप्रमाणे डॉक्टरांनी तपासणी करून आम्हाला ऑपरेशनसाठी शनिवारची तारीख दिली. त्याप्रमाणे आम्ही सुधाला लवकर घेऊन गेलो. त्यादिवशी ऑपरेशन झाले. त्यादिवशी संध्याकाळी सुधाला घरी सोडले. जातेवेळी डॉक्टरांनी हातभर चिठ्ठी लिहून दिली . त्रास होत असेल तरच ही औषधे घ्या . त्यांनी औषधाविषयी माहिती सांगितली आणि आम्ही सुधाला घेऊन घरी गेलो. काही दिवसांनी सुधाची तब्येत बिघडली. तिला चालता येत नव्हते. तिला जास्त वेदना होत होत्या. डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे औषधे दिली पण उपयोग झाला नाही. सुधाच्या वेदना आम्हाला पहावेनात नंतर सुधाला घेऊन डॉ. प्रधानांच्या कडे गेलो. डॉक्टरांनी सुधाची तब्येत पाहिली व सांगितले कोणत्या डॉक्टरांकडे घेऊन गेला त्यांच्याकडेच घेऊन जा. माझ्याकडे काहीही उपयोग होणार नाही. हे ऐकून सुधाने काकुळतीने सांगितले त्याप्रमाणे डॉक्टर प्रधानांनी दुस-या दवाखान्याची चिठ्ठी लिहून दिली. त्याप्रमाणे आम्ही सुधाला घेऊन गेलो. तेथे सुधाला ॲडमिट केले तिच्यावर औषधोपचार केला डॉक्टर प्रधान सुधाला पहाण्यासाठी त्याठिकाणी आले. त्यावेळी सुधाची अवस्था तिच्या तोंडातून शब्द निघत नव्हता . दातांची हालचाल नव्हती फक्त ओठ थोडेसे हालत होते हे डॉक्टरांनी पाहून तिची तपासणी केली व ते बाहेर निघून आले त्यापाठोपाठ निवेदक डॉक्टरांच्या पाठीमागे गेला. व सुधाला बरे वाटेल का म्हणून विचारले. त्यावेळी डॉक्टरांनी सांगितले इथून पुढे तिला मूल होणार नाही पण बरे वाटेल असे सांगून ते निघून गेले त्यावेळी निवेदक सुधाजवळ आला त्यावेळी सुधा निवेदकाला विचारते डॉक्टर काय म्हणाले ? त्यावेळी निवेदक सुधाला

म्हणाला ' तुला बरे वाटेल.'

ज्या डॉक्टरांनी सुधाचे ऑपरेशन केले. त्या डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे सुधाची अवस्था अशी झाली. त्यामुळे सुधाचा मृत्यू झाला.

**संसाराचे माळरान :**

अशा रितीने सुधा मरण पावते. माणसाची परिस्थिती माणसाला मरण ओढवते. प्रयत्न करूनही अपयश येते. वैवाहिक जीवनातील सुधाला त्यामुळे रंग भरण्याऐवजी त्यातच एक दरी निर्माण होते. दोघांच्याही उमललेल्या भावना करपून जाणे. कारण मूल होते हे त्यांना परवडण्याजोगे नसते. म्हणून सुधाचा निर्णय घेतात. पण हा मधला काळ दोघांनाही त्रासाचा जातो. घर दोन खोल्यांचे असल्यामुळे मोकळेपणाने बोलणे सोयीचे नव्हते.

अखेर गर्भपात करण्याचा निर्णय घेतो आणि त्या दृष्टीने हालचाल केली जाते. हे करूनही शेवटी सुधाला मृत्यू येतो. अवघ्या चार महिन्यात वैवाहीक जीवनाचे माळरान होते.

**अंतर्मुख करणारा आशय :**

एकात्मक परिणाम साधून पहाणारी ही कलाकृती कोठे तरी फसते आणि तिचा परिणाम विस्कळीत होतो. वाचकाला प्रश्न पडतो की, ही शोकांतिका खरी कोणाची त्याची की तिची ? त्याची असेल तर त्याच्या भावना कधीही टोकदार होत नाहीत. शोकात्मिकतेसाठी जीवनाला लागलेली तर त्याची जवळची नाही. आपल्या भावनेच्या भोवती असण्यापेक्षा ती निवेदक जादा आहे. त्याचे वैचारिक गुळगुळीतच राहिला आहे. मग प्रश्न पडतो की ही कादंबरी कोणाभोवती फिरते ? ही जर तिची शोकांतिका असेल तर तिचे मरण सिध्द होते काय ? तिचे मरण ही वाचकाची सहानुभुती मिळवण्याचा मार्ग आहे काय ? आयुष्यातील शोकात्मक सत्य केवळ मरणे सिध्द होते. त्याची शोकात्मिका अपर्याप्त ठरली. पहिले कारणच त्या कलाकृतीमध्ये यातना यांचा भर तितकाच सहजतेने केला आहे. एक नैसर्गिक भावनेची गळचेपी तिलाच करावी लागत आहे. आशयाचा गाभा तिच्या भावनांनीच व्यापक केला आहे. इतके असूनही तिच्या मृत्यूने आशय एकात्मिक परिणाम साधू शकत नाही. आणि कलाकृतीचे सूत्र आणि परिस्थितीची जागा, पैसा या दालनातून वावरत रहाते. [2]

## ** संदर्भ टिपा **

## ** प्रकरण दुसरे **


1. अलोचना वसंत कंशव दवतर अंक 5 जानेवारी 1973, पृष्ठ 29.

2. अलोचना वसंत केशव दवतर अंक 5 जानेवारी 1973, पृष्ठ 29.